ePaper


## “औरंगजेब देशाचा आदर्श”, प्रकाश आंबेडकरांचं फडणवीसांना प्रत्युत्तर



| वर्ष - 7 । अंक - 95 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | । शनिवार, दिनांक 5 ऑगस्ट 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


### आतील पानांत

- भारताला मिळाला नवा सिक्सर किंग
- राहुल गांधींना सर्वोच्च दिलासा !
- महाराष्ट्राचा महागद्दार कोण ?
- रिंकुने व्यक्त केल्या भावना


## जर्मन बेकरी बॉम्बस्फोट: चिखलीतील कुदळवाडीतून एका संशयिताला घेतले होते ताब्यात

# कुदळवाडी बनलीय दहशतवाद्यांचे आगार!

## » तपास यंत्रणांची करडी नजर!

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**औद्योगिकनगरी असलेल्या पिंपरी-चिंचवड शहरात कुदळवाडी हा भाग येतो. कुदळवाडीच्या लगत चाकण, तळेगाव दाभाडे एमआयडीसी आहे. शहरात लहान मोठे उद्योगधंदे आहेत. मोठ्या उद्योगांना पूरक ठरणारे जोडधंदे आहेत. त्यापैकी चिखलीतील कुदळवाडी या परिसरात सर्वाधिक भंगारमालाची दुकाने आहेत. रोजंदारीच्या निमित्ताने शहरात आलेले लोक कुदळवाडी या परिसरात राहतात. महापालिकेचा भाग असूनही शहरापासून थोडा दूर असल्यामुळे येथील घरभाडे दरही कमी आहेत, हे त्यामागचे कारण असल्याचे सांगितले जाते. स्थानिक लोकांकडून पुरेशी चौकशी न करता घरे भाड्याने दिले जातात. या सगळ्याचा फायदा गुन्हेगार घेत असल्याची चर्चा आहे.**

जर्मन बेकरी बॉम्बस्फोटात चिखलीतील कुदळवाडीतून एका संशयिताला पोलिसांनी ताब्यात घेतल्यापासून पिंपरी-चिंचवडमधील हा भाग सातत्याने चर्चेत असतो. परप्रांतीय, विशिष्ट भागातून आलेल्या स्थलांतरित लोकांची संख्या कुदळवाडीत वाढत असल्याने या भागावर स्थानिक पोलिसांसह देशभरातील तपास यंत्रणांची करडी नजर असते. त्यामुळे गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीने हा परिसर नेहमीच चर्चेत असतो. विशिष्ट भागातून आलेले लोक कुदळवाडीलाच राहण्यास प्राधान्य देताना दिसून येतात. शहराच्या दुसऱ्या भागात वास्तव्य करत नाहीत.

कुदळवाडीतील लोकसंख्येत प्रचंड वाढ झाली आहे. दाट लोकवस्ती झाली आहे. भंगार व्यवसायाच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या बाहेरून काही लोकांचे नेहमी या भागात ये-जा असते. जर्मन बेकरी बॉम्बस्फोटानंतर पोलिसांनी कुदळवाडीत शोध-मोहीम (सर्च ऑपरेशन) राबविले होते. तेव्हापासून हा परिसर पोलिसांच्या रडारवर आला आहे. यापूर्वी शहरात ज्या कारवाया झाल्या, धरपकड झाली, त्याचा संबंध कुदळवाडीशी असल्याचे दिसून आले. त्यामुळे पोलिसांना या परिसरावर विशेष लक्ष ठेवावे लागत आहे. हा परिसर तपास यंत्रणा आणि गुप्तचर यंत्रणाच्या नेहमीच रडावर राहिला आहे. कुदळवाडीतील वाढत्या घडामोडी लक्षात घेता देशातील सर्वोच्च गुप्तचर यंत्रणेचे कार्यालय पिंपरी-चिंचवडमध्ये सुरू करण्यात आले आहे. विशिष्ट भागातील आलेल्या स्थलांतरित लोकांची संख्या कुदळवाडीत वाढत असल्याने सध्या तो स्थानिक पोलिसांसह तपास यंत्रणांसाठी डोकेदुखीचा विषय ठरताना दिसतो.




### दहशतवाद्यांशी संबंध

» पुण्यातील जंगली महाराज रस्त्यावर झालेल्या साखळी बॉम्बस्फोटातील आरोपींचे कासारवाडी रेल्वे स्टेशनजवळ वास्तव्य असल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे. तेथेच त्यांनी बॉम्ब तयार केले होते. तळेगाव दाभाडे येथून एका कथित नक्षलवाद्याला अटक केली होती. मुंबई, गुजरातमधील बॉम्बस्फोटातील आरोपींशी संपर्कात असल्याच्या संशयावरून काही वर्षांपूर्वी तपास यंत्रणांनी पिंपरी चौकातून एकाची चौकशी केली होती. त्याचबरोबर अन्य काही समाजविघातक गोष्टींशी संबंध असल्याच्या संशयावरून पिंपरी-चिंचवडमधील दोघांची चौकशी सातत्याने यापूर्वी काही तपास यंत्रणांनी केली आहे.

> “ कुदळवाडीतील लोकसंख्येत प्रचंड वाढ झाली आहे. दाट लोकवस्ती झाली आहे. पोलीस यंत्रणा सतर्क आहे. कुदळवाडीवर बारकाईने लक्ष आहे. आयुक्तालयाच्या हद्दीतील सर्वच संवेदनशील भागावर पोलीस यंत्रणा लक्ष ठेवून आहे.
>
> **-विनयकुमार चौबे,**
> पोलीस आयुक्त, पिंपरी-चिंचवड

### » कुदळदवाडी भागात भंगार माफियांचा सुळसुळाट

### » पिंपरी चिंचवड शहरात महिन्याला 500/600 कोटी रुपये भंगार खरेदी विक्री सुरु

### » भंगार माफियांविरोधात कारवाई व्हावी

*» पिंपरी चिंचवड शहरातील मोशी कुदळदवाडी चिखली तळवडे या भागातील भंगार गोदाम गल्ली बोळात सुरू असून, त्या ठिकाणी पिंपरी चिंचवड, चाकण, मावळ, हिंजवडी.येथील एम.आय.डी.सीमधून भंगार गोळा करून विल्हेवाट लावण्यात येत असून, करोडो रुपये किमतीचे भंगार गोळा केले जात असून, पोलिस अधिकारी व कर्मचारी यांना हाताशी धरून एमआयडीसीमधून भंगार चोरीचे प्रकार मोठ्या प्रमाणावर सुरू असून, भंगार मालाची खरेदी विक्री भंगार गोळा करून कुदळदवाडी भागात आणून भंगार खरेदी विक्री करून भंगार विल्हेवाट लावण्यात येत असून, त्या संदर्भात पिंपरी-चिंचवड पोलिस व पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रशासन गप्प का, असा सवाल*



*येथील नागरीकांकडून होत आहे.*

*पिंपरी-चिंचवड शहरातील सामान्य नागरिकांना हा प्रश्न पडला असून, शहरातील मध्यवर्तीमध्ये इतक्या मोठ्या प्रमाणावर भंगार गोदाम कुदळदवाडी चिखली-तळवडे-मोशी भागात असून, सुमारे १५०० छोटे भंगार व्यवसायिक असून, ७००/८०० मोठे भंगार गोदाम या परिसरात असून, त्याठिकाणी भंगार गोळा करणारे कामगार उत्तर प्रदेश बिहार पश्चिम बंगाल भागातील असून, अतिरेकी कारवाया वाढल्या असून, गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्ती भंगार गोळा करून कुदळदवाडी चिखली तळवडे मोशी भागात गोदाम घेऊन भंगार माल त्या ठिकाणी साठवून ठेवत असून भंगार कंपनीमधून चोरून तसेच शहरातील इतर भागातून गोळा करून कुदळदवाडी भागात विल्हेवाट लावण्यात येत आहे. त्या भंगार मालाची खरेदी विक्री करून महिन्याला ५००/६०० कोटी रुपये भंगार माफिया कमवत असून, त्या संदर्भात पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तांनी ताबडतोब दखल घेऊन भंगार माफियांच्या विरोधात कडक कारवाई करण्यात यावी. त्या संदर्भात पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त व पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तांनी चिखली मोशी येथील कुदळदवाडी तळवडे भागातील भंगार माफियांच्या विरोधात फौजदारी गुन्हा दाखल करून चिखली मोशी कुदळदवाडी तळवडे भागातील भंगार गोदाम जप्त करून भंगार माल ताब्यात घेऊन कडक कारवाई करण्यात यावी. महाराष्ट्र राज्य सरकारचा महसूल बुडत असून, त्या संदर्भात अंमलबजावणी करण्यात यावी कुदळदवाडी या ठिकाणी भंगार व्यवसायिक गोदाम मध्ये मोठ्या प्रमाणावर गाड्यांचे स्पेअर पार्ट. इलेक्ट्रॉनिक वस्तू . तांबे पितळ. अॅल्युमिनियम. लोखंड,.रद्दी पेपर व पुठ्ठे इत्यादी वस्तू तसेच कंपनीतील इतर माल रबर.गाडयाचे टायर वगैरे वस्तू भंगार गोळा करून विल्हेवाट लावण्यात येत आहे.*

# अनधिकृत जाहिरात फलकांवर हातोडा

## » अनधिकृत जाहिरात फलकांवर 30 दिवसांत कारवाई

### »प्रत्येक अनधिकृत जाहिरात फलकाला 50 हजार रुपये दंड

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील नियमित होऊ न शकणारे अनधिकृत जाहिरात फलकांवर ३० दिवसांत कारवाई करण्यात येईल. त्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येईल, असे आश्वासन नगरविकास मंत्री उदय सामंत यांनी विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात दिले.**




पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत जाहिरात फलक आणि त्यामुळे होणाऱ्या अपघातांबाबत आमदार भीमराव तापकीर यांनी विधीमंडळाच्या अधिवेशनात चर्चा केली. शहरातील अधिकृत जाहिरात फलकांच्या परवान्यांचे दरवर्षी नूतनीकरण केले जाते. नूतनीकरण करताना, संबंधित व्यावसायिकाने स्थापत्य लेखापरीक्षणाचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. मात्र, त्याची अंमलबजावणी होत नसल्याने अपघात होत आहेत. त्यामुळे यासंदर्भात राज्य शासनाकडून कोणत्या उपाययोजना केल्या जाणार, स्थापत्य लेखापरीक्षण प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी आणि बांधकामाचा दर्जा तपासण्याची मोहीम राबविण्यात येणार का, अशी विचारणा तापकीर यांनी केली.

### 34 गावांमध्येही ही मोहीम

» पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरात अनधिकृत जाहिरात फलकांची संख्या जास्त असून, पिंपरी-चिंचवडमध्ये १ हजार १३६ जाहिरात फलकांपैकी २९७ जाहिरात फलक अनधिकृत आहेत. या सर्व अनधिकृत जाहिरात फलकांची तपासणी सुरू करण्यात आली असून, प्रत्येक अनधिकृत जाहिरात फलकाला ५० हजार रुपये दंड आकारण्यात येत आहे. इमारतीमध्ये जाहिरात फलक बसविताना सोसायट्या, इमारती यांचीही तपासणी करण्यात येईल. त्यांचे भोगवटा प्रमाणपत्र तपासून नियमित न होऊ शकणाऱ्या अनधिकृत जाहिरात फलकांवर ३० दिवसांत कारवाई करण्यात येईल. सामाविष्ट ३४ गावांमध्येही ही मोहीम राबविली जाईल, असे आश्वासन सामंत यांनी दिले.

---

# राष्ट्रवादी युवकच्या शिष्टमंडळाने घेतली आयुक्तांची भेट

## »पिंपरी चिंचवड शहरातील प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याची मागणी

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड शहर राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी शहरातील प्रलंबित प्रश्नांबाबत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे स्विय सहाय्यक सुनीलकुमार मुसळे यांच्या प्रमुख उपस्थितीत महापालिका आयुक्त श्री शेखर सिंह यांची भेट घेतली आणि शहरातील विविध प्रभागातील प्रलंबित कामे आणि समस्या सोडविण्याबाबत चर्चा केली.**



शहराच्या विविध प्रभागातील विकास कामे आणि प्रलंबित प्रश्न तसेच प्रभागातील इतर समस्या युवक पदाधिकाऱ्यांनी आयुक्तासमोर मांडल्या. विशाल वाकडकर यांनी त्यांच्या वाकड, ताथवडे पूनावळे भागातील दिवसेंदिवस होत असलेली वाहतुकीची गंभीर समस्या त्याचबरोबर खड्डेमय रस्ते, मुंबई बेंगलोर महामार्गावरील उड्डाणपुलाखाली पावसाळ्यात वारंवार साचनारे पाणी याबाबत सविस्तर विचारणा केली.

विशाल काळभोर यांनी त्यांच्या चिंचवड प्रभागातील रस्ते, उद्यान , स्वच्छता, विद्युत या विभागातील काही समस्या सोडविण्यासाठी आयुक्तांना विनंती केली. शेखर काटे यांनी दापोडी प्रभागातील समस्या सोडविण्यासाठी होत असलेल्या विलंबाबत मुद्दा उपस्थित केला. तसेच अक्षय माछरे यांनी त्यांच्या प्रभागातील प्रलंबित झोपडपट्टीचा प्रश्न तसेच शहरातील रुग्णालयातील अत्यावश्यक प्रश्न मांडले. त्याचबरोबर काही विकासकामात होत असलेल्या भ्रष्टाचाराचीही त्यांनी पोलखोल केली. प्रसाद कोलते यांनी त्यांच्या निगडी यमुनानगर प्रभागातील रस्ते, मोकाट जनावरे आणि श्वान, वाहतूक कोंडी तसेच उद्यान आणि इतर विविध विकासकामे याबाबत सविस्तर मुद्देसूद मांडणी केली.

मंगेश असवले यांनी दिघी येथील अनेक वर्षांपासून प्रलंबित असणाऱ्या रस्त्याचा प्रश्न मांडला. अजय तेलंग यांनी मागासवर्गीय समाजातील नागरिकांना मिळणाऱ्या पालिकेच्या योजनांबाबत महत्त्वपूर्ण मुद्दे उपस्थित केले.

जवळपास दीड तास चाललेल्या बैठकीत सर्व युवक पदाधिकाऱ्यांनी आपापल्या प्रभागातील प्रमुख आणि प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याची मागणी केली.

सर्व प्रश्नांवर महापालिका आयुक्त श्री शेखर सिंह यांनीही सकारात्मक चर्चा करत युवकांना आगामी काही काळात हे प्रश्न मार्गी लावण्याबाबत आश्वस्त केले. यावेळी युवकांकडून उपमुख्यमंत्री अजितदादा पवार युवा नेते पार्थ दादा पवार यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

### पदाधिकाऱ्यांची प्रामुख्याने उपस्थिती...

» **यावेळी अजित दादा पवार यांचे स्वीय सहाय्यक सुनीलकुमार मुसळे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष श्री विशाल वाकडकर, प्रदेश सरचिटणीस व पुणे प्रभारी श्री विशाल काळभोर, पिंपरी विधानसभा अध्यक्ष शेखर काटे, शहर उपाध्यक्ष प्रसाद कोलते, शहर उपाध्यक्ष तुषार ताम्हाणे, सरचिटणीस अक्षय माछरे, चेतन फेंगसे, प्रतीक साळुंखे, मंगेश आसवले, अजय तेलंग, समीर शेख आणि इतर युवक पदाधिकारी उपस्थित होते.**

# शहरवासीयांवर कृत्रिम पाणी टंचाई का?

## दिवसाआड पाणीपुरवठ्याचा निर्णय रद्द करा: नाना काटे

।पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड शहराला पाणी पुरवठा करणारे पवना धरण पूर्णपणे भरले आहे. तरी देखील शहरवासीयांवर कृत्रिम पाणी टंचाई कशासाठी? असा सवाल माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांनी उपस्थित केला आहे. तसेच शहरात सध्या होत असलेला दिवसाआड पाणीपुरवठ्याचा निर्णय रद्द करून दररोज पाणीपुरवठा सुरु करावा, अशी मागणी नाना काटे यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे केली आहे.**






नाना काटे यांनी आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पिंपरी चिंचवड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पवना धरण क्षेत्रात चांगल्या व मुबलक योग्य प्रमाणात पाऊस पडला आहे. ही आपल्यासाठी आनंदाची बाब असताना देखील शहरवासीयांवर दिवसाआड पाणी पुरवठ्याच्या नावाखाली कृत्रिम पाणी टंचाईची टांगती तलवार कशासाठी?, कटिबद्ध जनहिताय हे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे ब्रीद वाक्य आहे. त्यानुसार शहरवासियांना योग्य सुविधा देणे व तसेच समान, शुद्ध आणि पुरेशा दाबाने पाणीपुरवठा करणे हे महापालिकेचे आद्य कर्तव्य आहे.

### कृत्रिम पाणी टंचाईचे संकट दूर करावे

» परंतु गेल्या वर्षभरापासून प्रशासन व पाणीपुरवठा विभागाच्या मनमानी, नियोजन शून्य व भोंगळ कारभारामुळे धरणात मुबलक प्रमाणात पाणीसाठा असताना देखील शहरातील टँकर लॉबीला फायदा व्हावा म्हणून महापालिका प्रशासनाने तांत्रिक अडचणीचे कारण देत दिवसाआड पाणीपुरवठा हा पाणी कापतीचा निर्णय घेवून शहरात कृत्रिम टंचाई निर्माण केलेली आहे. याचा शहरातील नागरिकांना नाहक त्रास होत असून शहरवासियांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. हि खूप गंभीर बाब असून, म्हणून याचा विचार करता आयुक्तांनी त्वरित दिवसाआड पाणीपुरवठ्याचा निर्णय रद्द करावा. तसेच संपूर्ण पिंपरी चिंचवड शहरात दररोज व पुरेशा दाबाने योग्य प्रमाणत पाणी पुरवठा करावा असे आदेश संबंधित पाणीपुरवठा विभागाला देण्यात यावेत. शहरवासीयांवर गेल्या वर्षभरापासून प्रशासनाने लावलेले कृत्रिम पाणी टंचाईचे संकट दूर करावे अशी मागणी नाना काटे यांनी केली आहे.

---

# ...अन्यथा मोरया गोसावी देवस्थानच्या विश्वस्तांना काळे फासू

## संभाजी ब्रिगेडचा आक्रमक पवित्रा

।पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिंचवड येथील मोरया गोसावी मंदिरात छत्रपती संभाजी महाराजांविषयी अवमानकारक माहिती फलक लावण्यात आला आहे. संभाजी महाराजांचा वध झाला, अशी माहिती देण्यात आली आहे. वध हा शब्द जाणिवपूर्वक अवमान करण्यासाठी वापरला जात आहे. संभाजी महाराजांनी स्वराज्य निर्मितीसाठी दिलेले बलिदान असल्याची भावना बहुजनांमध्ये आहे.**




### तोंडाला काळे फासू, संतप्त इशारा

» मंदिर व्यवस्थापनाने हा माहिती फलक त्वरीत काढावा. दोन दिवसांमध्ये हा फलक हटवून महाराजांप्रती आदरयुक्त माहिती देणारा फलक उभारावा. अन्यथा संभाजी ब्रिगेडच्या वतीने तीव्र आंदोलन करत संबंधीत विश्वस्तांच्या तोंडाला काळे फासू, असा इशारा काळे यांनी दिला.

त्यामुळे मंदिरामधील अवमानकारक मजकूराने शहरातील बहुजनांच्या भावना दुखाविणाऱ्या असून त्वरीत हा फलक काढावा, अशी मागणी संभाजी ब्रिगेडचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष सतिश काळे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केली आहे. अन्यथा मोरया गोसावी देवस्थानच्या विश्वस्तांना काळे फासून निषेध करू, असा इशारा काळे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिला आहे. काळे यांनी दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात नमूद केले आहे की, छत्रपती संभाजी महाराज यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना अभिप्रेत असणाऱ्या स्वराज्याच्या स्थापनेसाठी शत्रुंविरोधात लढा दिला. अत्यंत शूर पराक्रमी योद्धा म्हणून संभाजी महाराजांचा नावलौकिक आहे.

प्रखर तेजोमय बुद्धीने ते शत्रुंवर मात करत होते. अशा राजाला महाराष्ट्रासह देशभरातील बहुजनांची लोक आपले प्रेरणास्थान मानत आहेत. असे प्रेरणास्थान असणाऱ्या छत्रपती संभाजी महाराजांविषयी अवमानकारक गोष्टी पसरविण्याची मनुवादी वृत्ती अद्यापही कार्यरत आहे. त्यांना वेळोवेळी धडा शिकविण्याचे काम केले आहेच.

मात्र तसाच एक प्रकार चिंचवड येथील मोरया गोसावी मंदिरात घडला आहे. या मंदिरात नारायण महाराज देव यांच्याविषयी माहिती देणारे माहिती फलक लावण्यात आले आहेत. त्यामध्ये एका फलकामध्ये छत्रपती संभाजी महाराजांचा वध झाला असा अवमान करणारा शब्द वापरला आहे. छत्रपती संभाजी महाराजांनी बहुजनांच्या हक्काच्या हिंदवी स्वराज्य निर्मितीसाठी लढा दिला आहे. शत्रुवर आक्रमक चाल करून चारी मुंड्या चीत केलेले आहे. मात्र काही मनुवादी वृत्तीच्या षडयंत्राने ते शत्रुंच्या तावडीत सापडले. त्यांना बलिदान द्यावे लागले. त्यामुळे वध हा शब्द अवमानकारक आहे.

---

# शोरूममध्ये काम करणाऱ्या दोघांकडून साडेसहा लाख रुपयांचा अपहार!




।पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

वाहनाच्या शोरूममध्ये काम करणाऱ्या दोघांनी मिळून साडेसहा लाख रुपयांचा अपहार केला. हा प्रकार १९ ऑगस्ट २०२२ ते १६ जून २०२३ या कालावधीत गारवे ऑटोमोबाईल्स प्रायव्हेट लिमिटेडच्या वाकड शाखेत घडला.

गौरेश गजानन सुगते (२५, रा. नवी सांगवी) यांनी वाकड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार प्रवीण मच्छिंद्र काळे (रा. काळेवाडी) आणि एका महिलेच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी सुगते हे गारवे ऑटोमोबाईल्समध्ये जनरल मॅनेजर म्हणून काम करतात. आरोपी प्रवीण हा सेल्समन तर आरोपी महिला रिसेप्शनिस्ट म्हणून काम करीत होती. दरम्यान, आरोपींनी आपसात संगनमत करून शोरूममधून बजाज कंपनीच्या विविध मॉडेलच्या दुचाकींची विक्री केली. दुचाकींचे पेमेंट आरोपींनी वैयक्तिक फोन पे आणि बँक खात्यावर स्वीकारले. विक्री केलेल्या गाड्यांचे कागदपत्रे न देता बनावट गेट पास, शोरूम बँक पावत्या बनवून ग्राहकांची फसवणूक केली. अशा प्रकारे आरोपींनी ग्राहकांकडून एकूण सहा लाख ६६ हजार ३३ रुपयांचा अपहार केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. वाकड पोलिस तपास करीत आहेत.




**ती केवळ 'मोदींचे मंत्री' म्हणून राहावे लागलेल्यांतच नव्हे, तर प्रवक्त्यांपर्यंत का दिसते? विरोधी पक्षांवर शरसंधानासाठी पूर्वीइतकीच ताकद भाजप आजही लावतो, तरीही अन्य पक्षीयांचा प्रभाव कसा काय वाढतो?**

# भाजपमध्ये शिणवटा का आला?

भाजपकडे नऊ वर्षे नक्कीच काही ना काही सांगण्याजोगे होते. कधीकाळी मोदी-शहांनी 'काँग्रेसमुक्त भारता'ची घोषणा केलेली होती. अचानक संसदेमध्ये अनुच्छेद ३७० रद्द करण्याचे विधेयक मांडून त्यांनी भाजप-संघाच्या कट्टर पाठीराख्यांना धक्का दिला होता. राम माधव यांच्यासारखे वाचाळ नेते 'अमित शहा असतील तर सगळे शक्य होते', असे उघडपणे बोलत होते. राम मंदिरासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला तेव्हा मुस्लिमांवर मिळवलेला पहिला सांस्कृतिक विजय असल्याचे समाधान लोकांना मिळाले होते. भाजप-संघाच्या मंडळींनीच नव्हे तर विचारांची बांधिलकी नसलेल्या अनेक देशवासीयांनी जल्लोष केला होता. हिंदू सांस्कृतिक वर्चस्वाचे श्रेय या लोकांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना दिले होते. २०१९ मध्ये पाकव्याप्त काश्मीरमध्ये घुसून अतिरेक्यांच्या छावण्या उद्ध्वस्त केल्या तेव्हा लोकांना वाटले होते की, मोदींच्या नेतृत्वाखाली भारत पाकव्याप्त काश्मीर ताब्यात घेणार! एवढा



प्रचंड धाडसी पंतप्रधान देशाला कधीही लाभणार नाही असा विश्वास वाटू लागला होता. मोदींच्या निर्णयप्रक्रियेतील अनिश्चितता हाही कौतुकाचा विषय ठरला होता. २०१४ मध्ये केंद्रामध्ये भाजपचे सरकार स्थापन झाल्यानंतर लोकांमध्ये दिसलेला उत्साह, आशावाद त्यांना मोदींच्या नेतृत्वाकडे आकर्षित करत राहिला.

मग, नऊ वर्षांनंतर मोदींचे सरकार मनमोहन सिंग सरकारसारखे आणि भाजप दहा-बारा वर्षांपूर्वीच्या काँग्रेससारखा का वाटू लागला आहे? सरकार आणि पक्ष दोन्हीमध्ये शिणवटा, तोचतोपणा, नावीन्याचा अभाव का जाणवू लागला आहे?

मोदींच्या नोटबंदीच्या निर्णयावर कमालीची टीका झाली असली तरी, नेत्यांची अख्खी फौज मोदींसाठी लढत होती. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन इतक्या त्वेषाने या निर्णयाचे समर्थन करताना दिसत होत्या की जणू हा निर्णय खुद्द त्यांनीच घेतला असावा. वास्तविक, त्या वेळी त्या वाणिज्य व कंपनीव्यवहार मंत्रीच होत्या आणि तेव्हाचे अर्थमंत्री अरुण जेटलींनाही या निर्णयाची कल्पना नसल्याची चर्चा त्यावेळी रंगली होती. तेव्हा अत्यंत आक्रमक होऊन विरोधकांना प्रत्युत्तर देणाऱ्या सीतारामन आता कुठे गायब झालेल्या आहेत? पत्रकार परिषदांमध्ये त्या बातमीदारांना गप्प करायच्या, आता त्या दुर्लक्ष करताना दिसतात. केंद्रीय मंत्र्यांकडे मोदींचे निर्णय ट्वीट करण्यापलीकडे काहीही लक्ष्यवेधी नसते. भाजपच्या प्रवक्त्यांच्या विधानांमध्ये देखील फरक नसतो. भाजपच्या प्रवक्त्यांनी राहुल गांधींवर टीका केली पाहिजे; पण ही टीकासुद्धा 'कॉपी-पेस्ट' केल्याचे जाणवू लागले आहे. देशद्रोही, विदेशी मदत वगैरे शब्दही एकसारखे आणि वारंवार कानांवर पडत राहतात. कधीकाळी भाजपचे नेते-प्रवक्ते वृत्तवाहिन्यांवर जीव तोडून विरोधकांना नामोहरम करायचे. आता कदाचित वृत्तवाहिन्यांची विश्वासार्हता संपली असावी म्हणून केंद्रीय मंत्र्यांना समाजमाध्यमांवरील तरुण 'इन्फ्लुएन्सर्स'ची मदत घ्यावी लागत आहे. मोदींचे केंद्रीय मंत्री परराष्ट्र धोरण, उद्योग-व्यापार धोरण यांची चर्चा 'यू-ट्यूबर'कडे करू लागले आहेत. २०१४ मध्ये भाजप समाजमाध्यमांच्या खेळात तरबेज होता, त्यांनी विरोधकांना धोबीपछाड दिली होती. आता हा खेळ काँग्रेसलाही जमू लागला आहे, विरोधकांनी मात केल्याने भाजपचे समाजमाध्यमांचे अस्त्रही प्रभावहीन होऊ लागले आहे. भाजपचे समाजमाध्यमांतील लोक कधीकधी बनावट माहिती- कथा रचतात हे लोकांनी अनुभवलेले आहे. गेल्या नऊ वर्षांमध्ये तरुण पिढीने फक्त भाजपचे सरकार पाहिले आहे, त्यांना काँग्रेसच्या सरकारांची माहिती नाही, त्यांना भूतकाळाशी घेणेदेणेही नाही. तरुण पिढीला आकर्षित करण्यासाठी नवे काहीतरी द्यावे लागेल याची जाणीव भाजपला झालेली असली तरी, काय करायचे हे ठरवता आलेले नाही. मध्यंतरी भाजपने समाजमाध्यमांचा प्रभावी वापर कसा करायचा यासाठी प्रशिक्षण शिबिरे आयोजित केली होती. 'मोदींचा चेहरा' या प्रभावी अस्त्राची धार कमी झाल्याची ही कबुलीच होती.

## संपादकीय »

# रेल्वेतले रस्त्यावर?

***धर्म ही पूर्णपणे वैयक्तिक बाब असल्याने कोणत्या धर्माविषयी ममत्व बाळगावे वा नाही, हा प्रश्नही वैयक्तिक. परंतु म्हणून अन्य धर्मीयांविरोधात हिंसेचा अधिकार कुणालाही नाही..***

धर्म, जात, वर्ण अशा मुद्द्यांवर सत्ताधीशांनी किती हवा तापवावी याचे भान असणे सामाजिक सौहार्दासाठी आवश्यक असते. हे सर्व घटक एका अर्थी नैसर्गिक. म्हणजे ते निवडण्याचा अधिकार व्यक्तीस नसतो. जन्माला येतानाच प्रत्येक व्यक्ती धर्म, जात आणि वर्ण घेऊन जन्माला येत असते. म्हणून जी गोष्ट निवडण्याचा अधिकार व्यक्तीस नाही तीबाबत 'गर्व से' म्हणण्यासारखे काय? पण तरीही या मुद्द्यावर डोकी भडकावण्याचे उद्योग वर्षांनुवर्षे सुरू आहेत आणि भरल्या डोक्यांनी-भरल्या पोटांनी तो करणारे; दोन्हींची वानवा असणाऱ्यांची डोकी फुटणे थांबावे यासाठी निष्क्रिय आहेत. ही निष्क्रियता नव्याने जाणवण्याचे कारण म्हणजे सोमवारी जयपूर-मुंबई रेल्वेतील हत्याकांड. यात रेल्वे सुरक्षा दलाच्या जवानाने चार जणांचे हकनाक प्राण घेतले.

**रशियात औट घटका बंडाचे निशाण फडकवणारी वॅग्नर टोळी आणि तालिबान किंवा आयसिसच्या टोळ्यांमध्ये काही साम्यस्थळे निश्चित आढळतील. हे सगळेच भाडोत्री सैनिक. वॅग्नरला रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी; तर तालिबानला पाकिस्तानी लष्करशहा आणि आयएसआय या गुप्तहेर संघटनेने पोसले आणि वाढवले.**

# अस्थैर्याच्या उंबरठ्यावर रशिया

आयसिसला इस्लामी देशांचा असलेला छुपा पाठिंबा अखेरीस उघडकीस आलाच. सामरिक परिभाषेत 'नॉन-स्टेट ॲक्टर' किंवा 'हायब्रिड वॉरफेअर' नामक एक खूळ पुंड देशांनी जन्माला घालून वाढवले, त्यांतीलच या पगारी, भाडोत्री टोळ्या. या सगळ्यांमध्ये एक समान दुवा म्हणजे अनेकदा त्या राष्ट्रराज्य म्हणवल्या जाणाऱ्या प्रदेशांतील प्रस्थापित सरकारांवरच उलटतात. वॅग्नरचे वरवरचे बंड हे अशाच प्रकारचे होते. या भाडोत्री किंवा खासगी फौजांना कसल्याही प्रकारचे बंधन नसते. ही मंडळी मानवी हक्क किंवा युद्धासंबंधी कोणत्याही आंतरराष्ट्रीय करारांच्या अधीन नसतात. त्यामुळेच त्या पदरी बाळगणे रशिया, इराण, पाकिस्तानसारख्या देशांना सोयीचे जाते. 'नैतिक पाठिंबा' अशा शब्दांचा वर्ख भाडोत्रींच्या दुष्कृत्यांना लावून त्यांचे पोशिंदे मोकळे होतात. कारण पोशिंद्यांचाच हेतू कुटिल असतो. वॅग्नर



आर्मीला पुतिन यांनी प्रथम क्रिमियात वापरून पाहिले. तत्पूर्वी आणि नंतरच्या काळात हे टोळीवाले सीरिया, लिबिया, माली, सुदान अशा देशांमध्ये जाऊन आले. दिमित्री उतकिन या चेचेन्यात लढून आलेल्या रशियन लष्करी अधिकाऱ्याने ही संघटना स्थापली आणि आता तिचे परिचालन येवगेनी प्रिगोझिन हा एके काळी पुतिन यांच्या विशेष मर्जीतला अब्जाधीश करतो. युक्रेनमध्ये रशियाने गतवर्षी फेब्रुवारीत सैन्य घुसवले, त्यावेळी काही ठाण्यांवर हल्ल्यांची जबाबदारी वॅग्नर गटावर सोपवण्यात आली होती. प्रिगोझिनच्या अमलाखाली जवळपास ३० हजारांचे सैनिक असल्याचे सांगितले जाते. यांतील बहुतेक जण रशियन लष्करात चाकरी करून आलेले आहेत. त्यांच्याकडे आधुनिक शस्त्रास्त्रेही आहेत. युक्रेनमध्ये सुरुवातीच्या मुसंडीनंतर अनेक ठिकाणी रशियन फौजांना युक्रेनच्या फौजांकडून कडवा प्रतिकार होऊ लागला आणि मोहीम थंड पडू लागली. युक्रेनसारख्या आकाराने मोठ्या परंतु लष्करीदृष्ट्या सामान्य कुवतीच्या देशासमोर रशियाला अपेक्षेप्रमाणे यश आले नाही, त्याच वेळी रशियन लष्कराच्या सुमार सिद्धतेचा आणि रशियन सामग्रीच्या कुचकामीपणाचा अंदाज सामरिक विश्लेषकांना येऊ लागला होता. क्रिमिया युक्रेनने मागे हातचा जाऊ दिला होता. पण डॉनेत्स्क आणि लुहान्स्क या दोन रशियाबहुल प्रांतांचा ताबा युक्रेन सहजी सोडत नव्हता. शिवाय कीव्ह, खारकीव्ह, खेरसन अशा मोठ्या शहरांचे रक्षणही अध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांच्या नेतृत्वाखाली युक्रेनच्या फौजांनी प्राणपणाने केले.

## ।। अभंगवाणी ।।



सांगतों तें तुम्हीं अइकावें कानीं ।
आमुचे नाचणीं नाचूं नका ॥१॥

जोंवरी या तुम्हां मागिलांची आस ।
तोंवरी उदास होऊं नका ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# महाराष्ट्राचा महागद्दार कोण ?

## » मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा उद्धव ठाकरेंवर हल्लाबोल

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत अंतिम आठवडा प्रस्तावावर भाष्य केलं आहे. यावेळी तुफान फटकेबाजी करत एकनाथ शिंदे यांनी शिवसेना ( ठाकरे गट ) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना लक्ष्य केलं. वर्षभर आमच्या ५० आमदारांना खोके आणि गद्दार म्हणून हिणवलं जातंय.**

पण, याचा सोक्षमोक्ष लावला पाहिजे. महाराष्ट्राचा महागद्दार कोण आहे? हे पाहिलं पाहिजे, असा घणाघात एकनाथ शिंदे यांनी अप्रत्यक्षपणे उद्धव ठाकरे यांच्यावर केला आहे. एकनाथ शिंदे म्हणाले, “वर्षभर आमच्या ५० आमदारांना खोके आणि गद्दार म्हणून हिणवलं जातयं. पण, याचा सोक्षमोक्ष लावला पाहिजे. महाराष्ट्राचा महागद्दार कोण आहे? हे पाहिलं पाहिजे.

ज्यांनी महाराष्ट्राच्या मतदारांशी, शिवसैनिकांशी आणि आपल्या परिवाराशीही गद्दारी आणि बेईमानी केली. मग ते कोण? या गोष्टी बोलायला मला आवडत नाही. “आपण ज्यांच्याबरोबर निवडून आलो, त्यांच्याबरोबर युती करून सरकार स्थापन केलं. मग,



बेईमानी आणि गद्दार कोणी केली? खूप गोष्टी बोलता येतात. संयम बाळगतो, याचा अर्थ आम्हाला काही माहिती नाही, असं समजू नयेत. अरे आमच्यावर ५० खोक्यांचा आरोप करतात. रोज शिव्या श्राप देतात. दुसरीकडे आमच्याकडचे ५० कोटी रुपये द्या, म्हणून पत्र देता.

खरे खोकेबाजे आणि खोकेबाज कोण?” असा सवाल एकनाथ शिंदे यांनी उपस्थित केला. ज्यांना बाळासाहेबांशी, शिवसेनेशी, शिवसैनिकांशी काही देणं, घेणं नाही. फक्त ५० खोक्यांवर त्यांचा डोळा आहे.

याचा इतर लोकांनी विचार

### गद्दाराचा सोक्षमोक्ष लावला पाहिजे

» एकनाथ शिंदे म्हणाले, वर्षभर आमच्या ५० आमदारांना खोके आणि गद्दार म्हणून हिणवलं जात आहे. परंतु, याचा सोक्षमोक्ष लावला पाहिजे. महाराष्ट्राचा महागद्दार कोण आहे? हे पाहिलं पाहिजे. ज्यांनी महाराष्ट्राच्या मतदारांशी, शिवसैनिकांशी आणि आपल्या परिवाराशीदेखील गद्दारी आणि बेईमानी केली. मग ते कोण? या गोष्टी बोलायला मला आवडत नाही.

करावा,” असा सल्लाही एकनाथ शिंदे यांनी ठाकरे गटातील आमदारांना दिला. एकनाथ शिंदे म्हणाले, त्यांनी (उद्धव ठाकरे) खेकड्याचा विषय काढला, रोकडे बंद झाले की यांना खेकडे दिसायला लागले.

खेकड्याची वृत्ती कोणाची आहे? हे आपल्या सगळ्यांना माहिती आहे. कोणी कोणाचे पाय खेचले? हेही सगळ्यांना माहिती आहे. मी कोणाची नावं घेत नाही. परंतु, नारायण राणे असतील, राज ठाकरे असतील किंवा छगन भुजबळ असतील, यांचे पाय कोणी खेचले? मनोहर जोशी यांना तर थेट मंचावरून खाली पाठवलं होतं. वरून खाली उतरवून थेट घरी पाठवलं. विजयरावही (विधानसभेचे विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार) त्यातले एक मूळ शिवसैनिक.

# औरंगजेब हिरो असूच शकत नाही

## » छ. शिवराय अन् संभाजी महाराजच हिरो

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज

**औरंगजेब हा भारतीय मुस्लीमांचा हिरो असूच शकत नाही; छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराजच हिरो होऊ शकतात असे वक्तव्य गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधीमंडळात केले आहे. हे सर्व जाणून बूजून सुरू आहे, असेही त्यांनी म्हटले आहे.**

पावसाळी अधिवेशनाचा आज शेवटचा दिवस आहे. अंतिम आठवडा प्रस्तावावर सत्ताधा-यांकडून उत्तर दिले जात आहे. राज्यांमध्ये महिला अत्याचार वाढत आहे. कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न मोठा प्रमाणामध्ये उपस्थित होत आहे. यावर बोलताना गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी औरंगजेबाच्या मुद्द्यावरूनही प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, औरंगजेबाच्या



### औरंगजेब देशाचा आदर्श

» हे कायद्याचं राज्य आहे. कोणीही कबरीवर जाऊ नये, मजारवर जाऊ नये किंवा कुठल्याही सांधू-संताच्या समाधीवर जाऊ नये, असं त्यांचं म्हणणं असेल तर मग कायदा करा. मग लोक तिथे जाणार नाहीत. तुम्ही कायदा करत नाही मग म्हणता जाता कशाला? प्रकाश आंबेडकर म्हणाले, एकतर कायद्याचं राज्य किंवा बिनाकायद्याचं राज्य असतं. दोनपैकी एक काहीतरी आम्हाला सांगा. आम्ही कायद्याचं राज्य मानतो. त्यामुळे असा कुठलाही कायदा नसल्याने (मजार किंवा कबरीवर जाऊन नये असा कायदा) आम्ही कोणाच्याही समाधीवर जाऊ. औरंगजेब हा फडणवीसांचा आदर्श होऊ शकत नाही. पण, देशाचा होतो ना! हे कशाला विसरत आहात? देवेंद्र फडणवीस किंवा आरएसएस हे काही देश नाहीत.

मिरवणुकी, स्टेट्स ठेवले गेले. एकाच वेळी अनेक जिल्ह्यात हा प्रकार झाला.

हा काही योगायोग नाही. हा प्रयोग आहे. आजपर्यंत भारतीय मुसलमानांचा हिरो कधी औरंगजेब नव्हता. या देशाचे हिरो छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराजच होऊ शकतात. एपीजे अब्दुल कलाम होऊ शकतात.

पण औरंगजेब होऊ शकत नाही. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ज्याप्रकारे संभाजी महाराजांचा छळ करून त्यांच्या शरीराचे तुकडे केले. तो औरंगजेब हिरो होऊच शकत नाही. टर्किक मंगोल वंशाचे भारत आणि पाकिस्तानात मिळून काही लाख लोक आहेत.

त्यांचे वंशजही भारतात नाही. पण अचानक औरंगजेबाचे महिमामंडन सुरू झाले आहे. त्यामागे काही डिझाईन आहे. काही अटकाही केल्या आहेत. धर्माच्या आणि जातीच्या आधाराव भेदभाव करणार नाही. पण औरंगजेबाचे कोणी महिमामंडन करत असेलत तर सोडणारही नाही, असा इशाराच त्यांनी दिला.

# जुगाराच्या अड्ड्यावर बसलाय का?

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज

विधानभेच्या अधिवेशनात आज (४ ऑगस्ट) आमदार बच्चू कडूंचा संताप पाहायला मिळाला. प्रहार जनशक्ती पार्टीचे अध्यक्ष बच्चू कडू विधानसभेत शेतकऱ्यांचे प्रश्न मांडत होते. बच्चू कडू विधानसभेत बोलत असताना शिवसेनेच्या ठाकरे गटातील नेते तसेच राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटातील नेते आपसात बोलत होते. त्यांच्या गप्पांमुळे बच्चू कडू यांना बोलताना अडथळा येत होता.

अखेर बच्चू कडू यांनी याबद्दल नाराजी व्यक्त केली. त्याचबरोबर ही नाराजी विधानसभा अध्यक्षांपुढे व्यक्त केली. तरीदेखील आमदारांमधील गप्पा सुरूच होत्या. अखेर, बच्चू कडू यांनी स्वतः या आमदारांना सुनावलं. तसेच तुम्ही सभागृहात बसलेले आहात की जुगाराच्या अड्ड्यावर गप्पा मारताय? असा प्रश्नही विचारला. आमदार बच्चू कडू म्हणाले, अध्यक्ष महोदय यांना थांबवाना, इथे इतकी मोठी चर्चा सुरू आहे. परंतु, हे लोक आपसात बोलत बसले आहेत. ते बघा, ते आदित्य ठाकरे, भास्कर जाधव, रवींद्र वायकर आणि शिवसेनेचे लोक आपापसात चर्चा करत बसले आहेत. हे लोक सभागृहात आहेत की, सभागृहाच्या बाहेर गप्पा मारत बसलेत तेच कळत नाही.

यावर तालिका अध्यक्षांनी या सर्व आमदारांना शांत राहण्यास सांगितलं. तसेच ते म्हणाले, बच्चू कडूंना बोलत असताना व्यत्यय येतोय. त्यामुळे शांत राहा. तरीदेखील हे आमदार बोलत होते. तालिका अध्यक्षांनी बजावल्यानंतरही आमदारांच्या गप्पा सुरू होत्या. त्यामुळे बच्चू कडू अधिकच संतापले. ते म्हणाले, अध्यक्ष महोदयांनी सांगितल्यानंतरही ही हे लोक बोलत आहेत. अध्यक्ष महोदय तुमचा प्रभावच पडत नाही. यांना सांगा आपसात बोलू नका. तुम्ही काय जुगार अड्ड्यावर बसलाय का? मीसुद्धा चार वेळा आमदार म्हणून निवडून आलोय.

# राहुल गांधींना सर्वोच्च दिलासा!

## » राहुल गांधी अविश्वास ठरावावर लोकसभेत बोलणार?

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मोदी आडनाव मानहानीप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने राहुल गांधी यांना मोठा दिलासा दिला आहे. गुजरात उच्च न्यायालयाने राहुल गांधींना दिलेल्या शिक्षेवर सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती आणली आहे. त्यामुळे राहुल गांधी पुन्हा संसदेत परतणार असल्याची चर्चा आहे. या सर्व पार्श्वभूमीवर राहुल गांधी यांनी आता प्रतिक्रिया दिली आहे.**

मोदी आडनावाची मानहानी केल्याप्रकरणी राहुल गांधी यांना गुजरातच्या उच्च न्यायालयाने दोन वर्षांची शिक्षा सुनावली होती. त्यानंतर लोकसभा सचिवालयाने राहुल गांधींची खासदारकी रद्द केली होती. या निर्णयाविरोधात राहुल गांधी यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या शिक्षेला स्थगिती दिली आहे. त्यामुळे राहुल गांधी यांना त्यांची खासदारकी परत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे."आडनावाच्या बदनामीच्या खटल्यावर शिक्षा सुनावत असताना राहुल गांधींना गुजरात न्यायालयाने सर्वाधिक असलेली दोन वर्षांची शिक्षा सुनावली. त्यांची खासदारकी रद्द व्हावी म्हणून ही शिक्षा सुनावण्यात आली का? त्यापेक्षा एक दिवसाची शिक्षा जरी कमी असती तर त्यांची खासदारकी रद्द झाली नसती.

त्यामुळे या प्रकरणातील जास्तीत जास्त दोन वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली हे हेतुपुरस्सर करण्यात आलं का?" असा प्रश्न सर्वोच्च न्यायालयाने विचारला आहे.राहुल गांधी यांच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश बी. आर. गवई, जस्टिस पी. एस. नरसिंहा आणि जस्टिस संजय कुमार यांच्या पीठाने सुनावणी केली. राहुल गांधींच्या वतीने अभिषेक मनु सिंघवी यांनी युक्तिवाद केला तर दुसऱ्या बाजूने महेश जेठमलानी यांनी युक्तिवाद केला.

संसदेचं पावसाळी अधिवेशन सुरू असून विरोधकांनी मोदी सरकारवर अविश्वास प्रस्ताव आणला आहे. अशा वेळी राहुल गांधी यांना त्यांची खासदारकी परत मिळणार असल्याने विरोधकांचा आत्मविश्वास दुणावला आहे. आता लोकसभा सचिवालय किती वेगाने यावर काम करणार ते पाहावं लागेल. ज्या क्षणी शिक्षेला स्थगिती मिळते त्या क्षणीच खासदारकी पुन्हा मिळते. त्या संबंधी राहुल गांधी यांना लोकसभा अध्यक्षांना त्याची एक प्रत द्यावी लागणार आहे. सरकारविरोधात आम्ही जो अविश्वास प्रस्ताव आणला आहे, त्यावर राहुल गांधींनी स्वतः भूमिका मांडावी. सगळ्या देशाला हे कळायला हवं की कशा पद्धतीने सत्ताधारी पक्ष राहुल गांधींविरोधात कारस्थान करत आहे असंही अधीर रंजन चौधरी म्हणाले.



> "काहीही झालं तरी, भारताच्या कल्पनेचे रक्षण करणे हेच माझं कर्तव्य राहणार आहे", असं राहुल गांधी म्हणाले. त्यांनी ट्वीट करून एका ओळीतच त्यांची प्रतिक्रिया दिली असून पुढे मी माझं कर्तव्य पार पाडतच राहीन असं त्यांनी म्हटलं आहे.
>
> – **राहुल गांधी**, काँग्रेस, खासदार

### सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय?

» गुजरात न्यायालयाच्या निर्णयाविरोधात राहुल गांधींनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेची सुनावणी आज न्यायमूर्ती गवईंच्या नेतृत्वाखालील तीन सदस्यीय खंडपीठासमोर झाली. सुनावणीनंतर निकाल देताना राहुल गांधींना सर्वाधिक शिक्षा देण्याची गरज नव्हती, असं न्यायमूर्तींनी नमूद केलं. तसेच, सर्वाधिक शिक्षा देण्याचं कोणतंही सबळ कारण गुजरात न्यायालयानं नमूद न केल्यामुळे या प्रकरणाची सुनावणी पूर्ण होईपर्यंत त्यांना दोषी मानण्याच्या आदेशांना स्थगिती देण्यात आली आहे.

### सर्वोच्च न्यायालयाचा परखड सवाल

» सुनावणीदरम्यान जेठमलानी यांनी वायनाडच्या मतदारांचा उल्लेख केला. "कोणत्याही मतदारसंघातील मतदारांचा हा अधिकार आहे की त्यांना दोषी नसलेल्या एखाद्या व्यक्तीला निवडण्याची संधी मिळावी", असं जेठमलानी यांनी म्हणताच न्यायमूर्ती नरसिंह यांनी गुजरात उच्च न्यायालयाच्या निर्णयावरच प्रश्न उपस्थित केला. "या प्रकरणात सर्वाधिक शिक्षा सुनावण्याची गरज काय होती?" असं ते म्हणाले. दरम्यान, यावर अभिषेक मनु सिंघवी यांनी "राहुल गांधींचं निलंबन म्हणजे त्यांच्या मतदारसंघातल्या मतदारांच्या अधिकारांचं हनन आहे", असा युक्तिवाद केला.

# भारतात लॅपटॉप महागणार?

## » संगणकांच्या आयातीवर तात्काळ निर्बंध

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केंद्र सरकारने गुरुवारी भारतात लॅपटॉप, टॅब्लेट आणि वैयक्तिक संगणकांच्या आयातीवर तात्काळ निर्बंध घालण्यात येणार असल्याची घोषणा केली. या अचानक आलेल्या निर्णयामुळे भारतात मॅकबुक्स, मॅक मिनीव अन्य कंपन्यांना भारतात या उपकरणाची आयात ताबडतोब थांबवावी लागली आहे.**

भारतात विकले जाणारे बहुतांश लॅपटॉप आणि पर्सनल कॉम्प्युटर हे चीनमध्ये तयार केले जातात किंवा असेंबल केले जातात आणि या नवीन नियमामुळे सरकार यापैकी काहींचे उत्पादन आणि असेंबलिंग भारतात सुरु करण्यासाठी प्रयत्नशील आहे. यापूर्वी अशा नियमांमुळे स्मार्टफोन उत्पादनात देशाने जे यश साध्य केले, त्याचप्रमाणे आता लॅपटॉपसाठी आयात निर्बंध लागू करण्यात आले आहेत.दरम्यान संबंधित कंपन्यांनी भारतात लॅपटॉप आणण्यासाठी विशेष परवानगी घेईपर्यंत किंवा भारतात उत्पादन सुरु करण्याचा निर्णय होईपर्यंत आयात निर्बंधामुळे भारतात लॅपटॉप, संगणक, मॅकबुक आणि मॅक मिनीच्या किमती वाढण्याची शक्यता आहे. अल्पावधीत आयात निर्बंधामुळे बाजारपेठेत टंचाई निर्माण होणे साहजिक आहे. त्यामुळे साधी आकडेमोड पाहिल्यास मागणी जास्त आणि पुरवठा कमी असल्याने किमतीत वाढ होऊ शकतो. इंडिया टुडेच्या माहितीनुसार, "एकूण लॅपटॉप/पीसी बाजारात दरवर्षी ८ अब्ज डॉलर्सचा व्यवसाय होतो तसेच सुमारे ६५ टक्के युनिट्स आयात केले जात आहेत.



### विक्री आणि सवलतींवर परिणाम

ऍपल आणि लेनोवो सारख्या कंपन्यांनी भारतीय बाजारपेठेत आधीपासूनच अस्तित्वात असलेल्या लॅपटॉपच्या किमती बदलल्या नाहीत तरीही, आयात निर्बंधामुळे किरकोळ विक्रेते आणि कंपन्या वेळोवेळी ऑफर करत असलेल्या विक्री आणि सवलतींवर परिणाम होण्याची शक्यता आहे. पुरवठ्यापेक्षा मागणी जास्त असल्याने, किरकोळ विक्रेत्यांना लॅपटॉपवर सूट-सवलत देण्यास जागा उरण्याची शक्यता कमी आहे.

# मला कधीच राग येत नाही : धनखड

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

मणिपूरच्या मुद्द्यावरून संसदीय पावसाळी अधिवेशन गाजलं आहे. विरोधकांनी दोन्ही सभागृह दणाणून सोडलं आहे. पंतप्रधानांनी सभागृहात याबाबत निवेदन सादर करावं, यावर विरोधक आग्रही आहेत. या मुद्द्यावरून आजही राज्यसभेत चर्चा सुरू होती. त्यावेळी राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे आणि राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांच्यात चांगलीच जुंपली. यावेळी मी ४५ वर्षांपासून विविहित आहे, त्यामुळे मला राग येत नाही, असं जगदीप धनखड म्हणाले. त्यामुळे सभागृहात खसखस पिकली. राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांनी खरगे यांना बोलण्याची संधी दिली. परंतु, लागलीच त्यांना खाली बसण्याची विनंती केली. "तुम्ही जरा रागात आहात वाटतं," असं खरगे म्हणाले. त्यावर जगदीप धनखड म्हणाले की, "मी ४५ वर्षांपासून विवाहित आहे.

मला कधीच राग येत नाही." धनखड यांच्या या वक्तव्यानंतर सभागृहात एकच हशा पिकला."चिदंबरम हे ज्येष्ठ वकिल आहेत. या सभागृहातील ज्येष्ठ नेते आहे. त्यांनाही माहित असेल की आम्हाला आमचा राग अधिकाऱ्यांना दाखवण्याचा अधिकार नाही. तुम्ही एक अधिकारी आहात", असंही धनखड खरगे यांना म्हणाले. "माझी पत्नी या सभागृहाची सदस्यही नाही. त्यामुळे तिच्याबद्दल येथे चर्चा करू शकत नाही.


# घूमरचा ट्रेलर




सय्यामी खेर, अभिषेक बच्चन, शबाना आझमी आणि अंगद बेदी स्टारर 'घूमर' चित्रपटाचा ट्रेलर रिलीज झाला आहे. एका अपघातानंतर उजवा हात गमावणारी महिला क्रिकेटर अनिकाचे जीवन या चित्रपटात दाखवण्यात आले आहे. यानंतर ती पुन्हा क्रिकेट खेळण्यासाठी धडपडते आणि एक प्रशिक्षक तिला यात मदत करतो. या चित्रपटात अभिषेक बच्चन एका प्रशिक्षकाच्या भूमिकेत दिसणार आहे जो अपघातानंतर अनिकाला मदत करतो. ट्रेलरमध्ये दाखवण्यात आले आहे की अनिकाचे लहानपणीचे स्वप्न आहे की तिला टीम इंडियासाठी खेळायचे आहे. ती ते मिळवते पण त्याच दरम्यान एका अपघातात तिचा उजवा हात गमावते. त्यानंतर अभिषेक बच्चनचे पात्र तिला प्रशिक्षण देते आणि अनिकाला डावखुरी गोलंदाजी करण्यास मदत करते. ट्रेलरमध्ये शेवटी अमिताभ बच्चन यांची झलकही दिसते. या चित्रपटात ते पाहुण्या कलाकाराच्या भूमिकेत दिसणार आहे. पार्श्वभूमीत त्यांच्या आवाजात एक संवाद देखील आहे ज्यात ते म्हणतात... आय लव्ह धिस गेम, जस्ट लव्ह इट. बिग बींनीही त्याचा ट्रेलर त्यांच्या सोशल मीडिया अकाउंटवर शेअर केला आहे. नेहा धुपिया, मिथिला पालकर, श्रेया धन्वंतरी, रोनित बोस आणि मोहित चौहान यांच्यासह अनेक सेलिब्रिटींनी या ट्रेलरचे कौतुक केले आहे. या चित्रपटाचे लेखक आणि दिग्दर्शक आर बाल्की आहेत. अभिषेक बच्चन त्याचा सहनिर्माता आहे. हा चित्रपट 18 ऑगस्टला रिलीज होणार आहे. त्याची टक्कर नुसरत भरुचा स्टारर अकेलीसोबत होणार आहे.

# पुष्पा-2 उन्हाळ्यात रिलीज?

अल्लू अर्जुनच्या पुष्पा या चित्रपटाच्या सिक्वेलची आतुरतेने वाट पाहिली जात आहे. चित्रपटाचे शूटिंग काही दिवस थांबवण्यात आले होते. रिपोर्ट्सनुसार, आता अल्लू अर्जुनने चित्रपटाच्या रिलीजबाबत नवीन रणनीती तयार केली आहे. त्याने प्रॉडक्शन टीमला हा चित्रपट उन्हाळ्यात प्रदर्शित करण्याचा सल्ला दिला आहे. हा चित्रपट 2024 मध्ये एप्रिल महिन्यात रिलीज होणार असल्याची चर्चा आहे. वास्तविक, चित्रपटाचे दिग्दर्शक सुकुमार यांना त्यांच्या मुलीच्या संगीत प्रशिक्षण अभ्यासक्रमाच्या कार्यक्रमासाठी काही दिवसांसाठी अमेरिकेला जायचे होते. त्यामुळे चित्रपटाच्या निर्मितीला विलंब होत आहे. रिपोर्ट्सनुसार, चित्रपटाच्या निर्मितीचे 60% काम अद्याप बाकी आहे. चित्रपटाच्या निर्मितीला उशीर होण्याचे एक कारण म्हणजे अल्लू अर्जुनने चित्रपटाच्या प्रदर्शनाबाबत नवीन रणनीतीचा विचार केला आहे. अल्लू अर्जुन एप्रिल महिन्यात उन्हाळ्याच्या सुट्टीत चित्रपट प्रदर्शित करण्याच्या बाजूने आहे. असे केल्याने अधिकाधिक प्रेक्षक चित्रपट पाहण्यासाठी येतील आणि चित्रपटाला चांगला प्रतिसाद मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. KGF 2 च्या यशाचा दाखला देत त्यांनी हा निर्णय घेतला आहे. अल्लू अर्जुनच्या सल्ल्यानुसार, आता प्रोडक्शन कंपनी एप्रिल 2024 मध्ये चित्रपटाच्या रिलीजची योग्य तारीख शोधत आहे. पुष्पा: द राइज डिसेंबर 2021 मध्ये प्रदर्शित झाला. चित्रपटाचे दिग्दर्शक सुकुमार आहेत. या चित्रपटात रश्मिका मंदान्ना, फहाद फाजील आणि जगपती बाबू यांच्या प्रमुख भूमिका आहेत. 'पुष्पा: द राइज' या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर जगभरात 332 कोटींची कमाई केली. या चित्रपटात चंदनाचा व्यवसाय जवळून पाहिल्यानंतर पुष्पा नावाच्या मजुराचे आयुष्य पूर्णपणे बदलून जाते. चित्रपटाच्या कथानकाशिवाय अल्लू अर्जुनची व्यक्तिरेखा, व्यक्तिरेखा आणि चित्रपटातील गाण्यांनाही चांगला प्रतिसाद मिळाला.



# रिंकुने व्यक्त केल्या भावना

अभिनेत्री रिंकु राजगुरु मराठी मनोरंजन विश्वात आर्ची या नावाने प्रसिद्ध आहे. रिंकूचे आजवरचे सर्व सिनेमे चाहत्यांच्या पसंतीला उतरले आहेत. रिंकु सोशल मिडीयावर सक्रीय असते. रिंकु तिच्या आगामी प्रोजेक्टबद्दलचे अपडेट्स तिच्या फॅन्सना देत असते. रिंकुने सोशल मिडीयावर एक पोस्ट केलीय. या पोस्टमध्ये रिंकुने तिने आयुष्यात पाहिलेल्या पहिल्या नाटकाचा अनुभव सांगितला आहे.रिंकु राजगुरुने सोशल मिडीयावर एक नवीन पोस्ट शेअर केलीय. रिंकुने प्राजक्त देशमुख लिखित दिग्दर्शित संगीत देवबाभळी नाटक पाहिलं. रिंकुने हे नाटक पाहिल्यावर सोशल मिडीयावर फोटो शेअर केले आहेत. हे फोटो पोस्ट करुन रिंकु लिहीते.. माझ्या आयुष्यातील मी पाहिलेलं पहिलंच नाटक. अप्रतिम अनुभूती. सगळ्याच अंगाने सर्वांगसुंदर असं नाटक आहे 'देवबाभळी'. प्राजक्त आणि सगळ्या टीमला खूप शुभेच्छा आणि मनापासून अभिनंदन! रिंकु राजगुरु आता राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त दिग्दर्शक मकरंद माने यांच्या खिल्लार या आगामी चित्रपटात दिसणार आहे. या सिनेमात बैलगाडा शर्यत आणि त्याभोवतीचे वातावरण दाखवले जाणार असून, रिंकू राजगुरू आणि ललित प्रभाकर या चित्रपटात प्रमुख भूमिकेत दिसणार आहेत.न्युक्लिअर ॲरो पिक्चर्स या निर्मिती संस्थेतर्फे 'खिल्लार' या चित्रपटाची निर्मिती करण्यात येत आहे. नगरसेवक संतोष भेगडे यांच्या वाढदिवसानिमित्त तळेगाव मावळ इथं झालेल्या पुणे जिल्हा केसरी भव्य २०-२० बैलगाडा शर्यतीवेळी 'खिल्लार' चित्रपटाची घोषणा करण्यात आली.

# ना एल्विश ना अभिषेक !

बिग बॉस ओटीटी 2 चा दुसरा सिझन बराच गाजला. कधी स्पर्धकांमधील वाद तर कधी घरात आलेले वाईल्ड कार्ड स्पर्धक यांनी घरात खुपच राडा घातला. एल्विश यादवच्या वाईल्ड कार्ड एन्ट्रीनंतर हा शो आणखीनच रोमांचक झाला. त्याच्या चाहत्यांनी तर त्याला आत्ताच विनर घोषित केलं आहे. त्यात आता या विकेंड का वार मध्ये पुन्हा कोण घराबाहेर जाणार याकडे प्रेक्षकांच्या नजरा लागल्या आहेत. मात्र शो मध्ये जिया शंकरला पुन्हा ट्रोल करण्यात येत आहे तर पुजा भट्टला तिच्या वागण्यामुळे काहींनी ट्रोल केलं तर काहींनी सपोर्ट केला आहे. अभिषेकनं फायनलचं टिकीट मिळवलं आहे.आता या शोमध्ये सुरु असलेल्या महभारतावर सोशल मिडियावर चर्चेत असणाऱ्या उर्फी जावेदने कमेंट केली आहे. उर्फी ही बिग बॉस पाहत असते.



# रश्मीला प्रेमात मिळालं अपयश

टीव्ही इंडस्ट्रीतील प्रसिद्ध अभिनेत्री रश्मी देसाईने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. अभिनेत्रीने टीव्ही शोपासून ते चित्रपटांमध्ये काम केले आहे. रश्मी सोशल मीडियावरही खूप सक्रिय आहे. यासोबतच ती तिचं एक फोटोशूट शेअर करत असते. त्यामुळेच चाहते त्याच्या पोस्टची आतुरतेने वाट पाहत आहेत. सध्या रश्मी देसाई टीव्ही किंवा चित्रपट कुठेच सक्रिय दिसत नाही. ती सध्या काय करते असा प्रश्न तिच्या चाहत्यांना पडला आहे. टीव्ही शो 'उतरन'मध्ये तपस्या म्हणून प्रसिद्ध



झालेली अभिनेत्री रश्मी देसाई 2022 मध्ये वेब सीरिज 'रात्री के यात्री', टीव्ही सीरियल 'नागिन 6' आणि अनेक गाण्यांमध्ये दिसली होती. पण रश्मी बऱ्याच दिवसांपासून कोणत्याही नवीन प्रोजेक्टमध्ये दिसलेली नाही. रश्मिने २०१२ मध्ये टीव्ही अभिनेता नंदिश संधूसोबत लग्न केले, मात्र चार वर्षांनंतर दोघेही वेगळे झाले. बिग बॉस 15 च्या वेळी रश्मी देसाईने सांगितले होते की घटस्फोटानंतर तिची अरहान खानशी जवळीक वाढली होती. पण अरहानला मुलंही असल्याचं समजल्यानंतर तिचे अरहानसोबतचं नातंही तोडलं. तेव्हापासून ही अभिनेत्री सिंगल लाइफ एन्जॉय करत आहे.

# बांगलादेश क्रिकेटमध्ये काय चाललय?

## » आधी निवृत्ती घेतली मग 24 तासात मागे; कॅप्टन्सीचा राजीनामा

**नवी दिल्ली । नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

**एकीकडे भारतासहित सर्व आंतरराष्ट्रीय संघ आशिया चषक आणि एकदिवसीय विश्वचषक २०२३च्या तयारीत व्यस्त आहेत, तर दुसरीकडे बांगलादेशमध्ये प्रचंड नाट्य सुरू आहे. अफगाणिस्तानविरुद्धच्या पराभवानंतर तमिम इक्बालने अचानक निवृत्ती घेतली होती. त्यानंतर अवघ्या एका दिवसात पुनरागमन करत आता कर्णधारपद सोडले आहे. एवढेच नाही तर तो आशिया कपमध्येही खेळणार नाही.**

ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये खेळवला जाणार आहे. ३४ वर्षीय सलामीवीराने ढाका येथे बांगलादेश क्रिकेट बोर्डाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी भेट घेतल्यानंतर दुखापतीच्या समस्येचे कारण देत आपला निर्णय जाहीर केला. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेण्याच्या त्याच्या यू-टर्ननंतर एका महिन्याच्या आत त्याने हा निर्णय घेतल्याने बांगलादेश क्रिकेटमध्ये नेमकं काय चाललंय असा प्रश्न पडतो. बैठकीनंतर तमिम म्हणाला, “मी त्यांना (बीसीबी अधिकाऱ्यांना) कळवले आहे की, आजपासून मी बांगलादेश वन डे संघाचे कर्णधारपद सोडत आहे. मी दुखापतग्रस्त असल्याचे कारण दिले आहे.”माजी कर्णधार तमीम पुढे म्हणाला, “मी नेहमीच संघाचा विचार आधी केला आहे. संघाच्या भल्यासाठी (मला वाटले) मी कर्णधारपद सोडले पाहिजे आणि एक खेळाडू म्हणून स्वतःच्या फलंदाजीवर लक्ष केंद्रित केले पाहिजे. जेव्हा जेव्हा मला संधी मिळेल तेव्हा तेव्हा माझा सर्वोत्तम देण्याचा प्रयत्न केला आहे आणि पुढेही करेन.” बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांनाही त्याने त्याच्या निर्णयाची माहिती दिली आणि त्यांनी ती मान्य केली. जुलैमध्ये नुकत्याच झालेल्या मायदेशातील मालिकेदरम्यान तमिमने सर्व प्रकारच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली, परंतु हसीनाच्या विनंतीवरून एका दिवसानंतर त्याने आपला निर्णय मागे घेतला होता. अफगाणिस्तानविरुद्धच्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतील पहिल्या सामन्यात आपल्या संघाचा १७ धावांनी पराभव झाल्यानंतर त्याने आंतरराष्ट्रीय निवृत्तीची घोषणा केल्याने अनुभवी सलामीवीराला अश्रू अनावर झाले होते. बांगलादेश क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष नजमुल हसन यांनी तमीमवर जाहीर टीका केली होती. तमिमने कबूल केले की, तो १०० टक्के तंदुरुस्त नाही, तरीही तो अफगाणिस्तानविरुद्धचा सामना खेळला. पंतप्रधान हसीना यांनी दुसऱ्या दिवशी तमीम आणि नजमुल यांना त्यांच्या घरी बोलावले आणि त्यांना आपला विचार बदलण्यास प्रवृत्त केले. तमीमला मात्र अफगाणिस्तानविरुद्धचे उर्वरित दोन एकदिवसीय सामन्यांना मुकावे लागले. त्याने दुखापतीतून सावरण्यासाठी सहा आठवड्यांचा ब्रेक घेतला.



### तमीमची डिस्कची दुखापत बरी

» तमिमने मालिकेतून माघार घेतल्यानंतर उरलेल्या अफगाणिस्तान वन डेत सलामीवीर लिटन दासने बांगलादेशचे नेतृत्व केले. बीसीबीचे क्रिकेट ऑपरेशन्सचे प्रमुख जलाल युनूस यांनी सांगितले की, “तमीमची डिस्कची दुखापत पूर्णपणे बरी झालेली नाही.” जलाल पुढे म्हणाले, “डॉक्टरांनी सुचवले आहे की, त्याला आशिया कपमध्ये खेळणे शक्य होणार नाही. तो न्यूझीलंड मालिका आणि विश्वचषकासाठी उपलब्ध असेल. दुखापतीतून सावरण्यासाठी त्याला सर्व प्रकारचा पाठिंबा आणि मदत दिली जाईल.बीसीबीच्या अधिकाऱ्याने पुढे सांगितले की, “नवीन वनडे कर्णधाराचे नाव योग्य वेळी ठरवले जाईल. आशिया चषक खेळल्यानंतर बांगलादेश सप्टेंबरच्या अखेरीस तीन एकदिवसीय सामन्यांसाठी न्यूझीलंडला रवाना होणार आहे. ७ ऑक्टोबर रोजी धरमशाला येथे अफगाणिस्तानविरुद्ध भारतातील विश्वचषक मोहिमेची सुरुवात करतील.

# पाकिस्तानचे नखरे अजूनही सुरूच!

## » भारतात येण्यापूर्वी पीसीबीकडून सुरक्षेची अट

**नवी दिल्ली । नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

**पाकिस्तानमधील सुरक्षा व्यवस्थेची स्थिती कोणापासून लपून राहिलेली नाही आणि त्यामुळे इतर संघ तेथे खेळायला जाण्यास बराच वेळा संकोच करतात. दुसरीकडे, पाकिस्तान क्रिकेट बोर्ड २०२३ मध्ये भारतात होणाऱ्या विश्वचषकाच्या सुरक्षेबाबत चिंता व्यक्त करत आहे. आतापर्यंत जरी आयसीसीने पीसीबीची कोणतीही गोष्ट मान्य केलेली नाही तरी, मात्र रोज नव्या मागण्या पाकिस्तान मांडतच आहे.**

सरकार आणि पीसीबीने भारतात खेळताना त्यांच्या संघाच्या सुरक्षेची हमी देण्यासाठी आयसीसीकडून लेखी आश्वासन मागितले आहे. मात्र, अद्यापपर्यंत आयसीसीकडून यावर कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही. पाकिस्तानची स्वतःची परिस्थिती पाहता ही मागणी त्यांनी करणे म्हणजे हास्यास्पद आहे. पाकिस्तान क्रिकेट संघ विश्वचषक खेळण्यासाठी भारतात येणार की नाही, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. दरम्यान, पाकिस्तान क्रिकेट बोर्ड आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदकडून भारतात संपूर्ण सुरक्षा मिळेल असे लेखी आश्वासन मागणार असल्याची बातमी समोर आली आहे. गुरुवारी ११ सदस्यीय पीसीबी समिती विश्वचषका खेळण्यासाठी साठी भारतात जायचे की नाही याचा निर्णय घेईल. वास्तविक, पाकिस्तान हे सर्व यासाठी करत आहे जेणेकरून ते भारतात असुरक्षित असल्याचे दाखवता यावे. याचे एक कारण म्हणजे बीसीसीआयने आशिया चषकासाठी पाकिस्तानला जाण्यास स्पष्ट नकार दिला होता. आशिया चषक स्पर्धेचे आयोजन पाकिस्तानने केले होते, परंतु आता या स्पर्धेतील केवळ ४ सामने पाकिस्तानमध्ये होणार आहेत. सेमीफायनल आणि फायनलसह भारताचे सर्व सामने श्रीलंकेत होतात. यामुळे पीसीबी प्रचंड संतापले आहे. २०२३च्या विश्वचषक स्पर्धेत सहभागी होण्यासाठी पाकिस्तानातून संघाच्या सहभागाबाबत अद्याप कोणतीही मान्यता देण्यात आलेली नाही. भारतात खेळण्यासाठी येणाऱ्या पाकिस्तानी संघाला मान्यता देण्यासाठी सरकारने १५ सदस्यांची समिती स्थापन केली होती.



### सामन्यांच्या तारखा बदलू शकतात

आयसीसीने जाहीर केलेल्या अधिकृत वेळापत्रकात काही बदल होण्याची शक्यता आहे. यामध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात १५ ऑक्टोबरला होणारा सामना १४ तारखेला अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळवला जाऊ शकतो. हा हाय व्होल्टेज सामना पाहण्यासाठी संपूर्ण देश उत्सुक आहे. याशिवाय, वेळापत्रकात काही बदल होऊ शकतात, ज्यामध्येपाकिस्तानच्याआणखीदोनसुरुवातीच्यासामन्यांच्यातारखेतबदल होण्याची चर्चा आहे.

# भारताला मिळाला नवा सिक्सर किंग

**त्रिनिदाद । नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

युवराज सिंगला भारत कधीही विसरू शकत नाही. कारण युवराजच्या जोरावर भाराने दोन विश्वचषक जिंकले होते. पण आता भारताला एक नवा सिक्सर किंग सापडला आहे. कारण पहिल्याच चेंडूवर त्याने जेव्हा षटकार झळकावला तेव्हा सर्वांनाच युवराजची आठवण आल्यावाचून राहावले नाही.युवराज सिंग हा सिक्सर किंग म्हणून अजूनही क्रिकेट विश्वात ओळखला जातो. आतापर्यंत भारताला सिक्सर किंग मिळाला नव्हता. पण त्याचा पहिला फटका जेव्हा पाहिला तेव्हा तो षटकार होता आणि त्यावेळी सर्वांनाच युवीची आठवण आली होती. या फलंदजाला भावी युवराज असेही म्हटले जाते. आयपीएलमध्ये ज्याने धावांच्या राशी उभारल्या. सामना हातामधून जातोय असे वाटत असताना संघाने ज्याला खेळायला पाठवले आणि त्याने बऱ्याचदा संघाला विजय मिळवून दिला असा खेळाडू आहे तो म्हणजे मुंबई इंडियन्सकडून खेळणारा तिलक वर्मा. मुंबई इंडियन्सकडून खेळताना तिलकने आपली स्वत:ची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे आणि त्याच्याच जोरावर त्याला भारताच्या टी-२० संघात स्थान मिळाले आहे. बऱ्याच वर्षांनी भारताला मधल्या फळीत युवराजसारखा खेळणारा डावखुरा फलंदाज सापडल्याचे म्हटले जात आहे. त्यामुळे त्याला काही चाहते ज्युनिअर युवराज सिंग, असेही म्हणतात. वेस्ट इंडिजविरुद्धच्या पहिल्या चेंडूवर त्याने जो षटकार लगावलाते पाहता सर्वांनाच युवराजची आठवण आली. दुसऱ्या चेंडूंवरही तिलकने षटकार लगावला. या सामन्याच तिलकने तीन षटकार लगावले आणि या तिन्हीवेळी युवराजची आठवण आली. त्यामुळे आता भारतीय संघाला नवा युवाज सिंग सापडला आहे, अशी चर्चा सध्याच्या घडीला क्रिकेट विश्वात सुरु झाली आहे.